**जगभर**

# अरब लोकशाहीचा उदय

## चंद्रशेखर पुरंदरे

उत्तर आफिका-मध्यपूर्वेच्या नकाशाकडे एक नजर टाकली की अरब हुकूमशाहीची अखंड साखळी दिसते. सगळ्यात डावीकडे मोरोक्को हा देश आहे. तिथपासून अल्जिरिया, ट्यूनिशिया, लिबिया, इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, येमेन, ओमान इथपर्यंत सगळे देश वसाहतवाद संपून 'स्वातंत्र्य' मिळाल्यापासून (सौदी अरेबियासारखे अपवाद सोडता, तेथे वसाहतवाद नव्हता पण राष्ट्राच्या स्थापनेपासूनच) हुकूमशाहीखाली आहेत. लष्कराच्या सामर्थ्यावर, पाश्चात्य 'लोकशाही' भांडवलशाही देशांच्या (ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका) पाठिंब्यावर आणि काही ठिकाणी तेलाच्या साठ्यांवर या राजवटी तगून आहेत. या देशातील तरुण पिढीला हुकूमशाही - तीही बहुश: एकाच व्यक्तीची किंवा घराण्याची - खेरीज दुसरी राजवटच माहिती नाही.

अरब देशांची एकूण लोकसंख्या सुमारे २५ कोटी आहे. यातील निम्मे लोक पंचविशीच्या आतले आहेत. बेरोजगारी, वशिलेबाजी, भ्रष्टाचार याचा फटका या पिढीला जास्त बसतो. त्यात हुकूमशाहीमुळे विरोध करण्याची मुभा नाही आणि आर्थिक-सामाजिक परिस्थिती सुधारण्याची काहीच शक्यता नाही. या कारणांमुळे सत्ताधीशांविरुद्ध असंतोष खदखदत राहिलेला आहे.

या असंतोषाचा फायदा काही प्रमाणात इस्लामी मूलतत्त्ववादी घेत आहेत. उदाहरणार्थ, सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवरील हल्ल्यातील प्रमुख गुन्हेगार शिक्षित सौदी अरेबियन तरुण होते. पण मूलतत्त्ववाद आणि त्या अनुषंगाने आत्मघातकी हल्ल्यांसारखा अतिरेकीपणा जनसामान्यांना मान्य नसणार, ही साधी बाब आहे. पण पश्चिमेला ही साधी बाब सोईची नाही म्हणून या इस्लामी मूलतत्त्ववाद्यांना काबूत ठेवण्यासाठी हुकूमशहांना पोसणे आवश्यक आहे असा युक्तिवाद आजवर करण्यात आलेला आहे. दुसऱ्या शब्दांत, जनसामान्यांच्या शोषणाचे आणि इस्लामी मूलतत्त्ववादाच्या वाढीचे, दोन्हीचे कारण हुकूमशाही हे असताना पश्चिमेने त्याकडे दुर्लक्ष करून सामाजिक असंतोषाला खतपाणी घातले आहे.

**ट्युनिशिया**


अशा हुकूमशाहीविरुद्धचा पहिला उद्रेक डिसेंबरमध्ये ट्युनिशियात झाला. तेथे एका छोट्या शहरात फळे-भाज्या रस्त्यावर विकून आपले कुटुंब (आई, बहिणी) कसेबसे घालवणाऱ्या एका (अविवाहित) तरुणाला नगरपालिकेच्या फिरत्या वाहनातून देखरेख करणाऱ्या इन्स्पेक्टर महिलेने छेडले. त्या वादावादीत या महिलेने या तरुणाच्या मुस्काटीत मारली का त्याने तिच्या, हे अनिश्चित आहे. पण आपल्याकडे फुटपाथवर बेकायदा किरकोळ विक्री करणाऱ्यांचा माल जसा कॉर्पोरेशनची गाडी जप्त करते, तोच प्रकार तेथे झाला. त्या तरुणाने नगरपालिकेत जाऊन माल परत देण्याची मागणी केली. त्याला अर्थातच कोणी दाद दिली नाही. मग त्याने टोकाची कृती केली. त्याने स्वत:ला नगरपालिकेच्या इमारतीसमोर पेटवून घेतले. त्यात तो मरण पावला. हा प्रकार मोबाईल फोनवरच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपला. मग गावातले वातावरण प्रक्षुब्ध झाले. लोक रस्त्यावर आले, त्यांच्यावर पोलिसांनी दंडेलशाही सुरू केली. ते चित्रणही प्रथम फेसबुकवर, मग अल्-जझीरा या मध्यपूर्वेतील प्रमुख अरबी चॅनेलवर आले. त्यामुळे ट्युनिशियात तर खळबळ माजलीच पण सगळ्याच मध्यपूर्वेत भूकंप झाला.

१९८७ पासून ट्युनिशियात बेन अली या सर्वेसर्वांची सत्ता अबाधित राहिली आहे. तेव्हापासून तो आणि त्यांचे कुटुंबीय देशाला लुटत आहेत (होते). प्रत्येक सरकारी कंत्राटातून टक्का घेणे, खासगी कंपन्यांकडून पैसा मिळवणे आणि याद्वारे आपले अतोनात विलासी राहणीमान चालू ठेवणे हे जनतेला दिसत होते. एका अंदाजानुसार बेनची स्वीस बँकेतील रोकडच २२ बिलियन डॉलर्स असावी. ट्युनिशियातील बेनामी, बेहिशेबी मालमत्ता तर निराळीच.

हा भ्रष्टाचार अर्थातच निम्न दर्जाच्या सरकारी कर्मचाऱ्यांपर्यंत पोचलेला होता. रहदारी नियंत्रण करणारे पोलिस, परवाने देणारे नगरपालिकेचे कर्मचारी वगैरे मंडळी सामान्य नागरिकाला पाच पन्नास रुपयांसाठी आपल्याकडच्यासारखाच त्रास देत असत. विशेष म्हणजे, पश्चिमेच्या गुप्तहेर संघटनांना ही सगळी माहिती होती आणि ती माहिती या संघटना त्यांच्या देशांना वेळोवेळी देतही असत. अगदी जुलै २००९ला अमेरिकन राजदूताने त्याच्या सरकारला पाठवलेल्या गुप्त संदेशात बेन अली कुटुंबीय किती उधळपट्टी करत जगतात हे कळवले होते. (बेन अलीच्या मुलाने एक वाघ पाळला होता, राजदूताच्या मेजवानीसाठी फ्रान्सहून काही पदार्थ खास आयात करण्यात आले होते, वगैरे) हे 'गुप्त' संदेश विकीलिक्स या इंटरनेट तस्करी संघटनेने नुकतेच प्रसिद्ध केले.

या साऱ्या पार्श्वभूमीवर स्वत:ला जाळून घेणाऱ्या तरुणाचे निमित्त

झाले. हा उद्रेक लष्कराच्या आवाक्यातला नाही हे लक्षात आल्यावर शंभर एक विरोधकांच्या हत्येनंतर बेन अलीने सौदी अरेबियाला - दुसऱ्या हुकूमशाहीला - पलायन केले. या घटना - निषेधाची सुरुवात ते पलायन - १४ जानेवारीपर्यंतच्या महिन्यातच घडल्या. २२ वर्षे सत्ता चालवणारा हुकूमशहा महिन्याभरातच हद्दपार होऊ शकतो ही विस्मयकारक घटना आहे. त्यातल्या त्यात पश्चिमेचा निगरगट्टपणा कमी झाल्याचे लक्षण म्हणजे बेन अली आणि कुटुंबियांचे स्विस बँकेतील खाते स्वित्झर्लंडने गोठवले आहे. म्हणजे, किमान ते २२ बिलियन डॉलर्स तरी त्याला सौदी अरेबियात उपलब्ध होणार नाहीत.




बेन अली परांगदा झाल्यानंतरचे ट्युनिशियाचे नवीन राजवटीचे चित्र अजून स्पष्ट नाही. पण, किमान नवीन हुकूमशहा किंवा लष्करशाही परत येण्याची शक्यता कमी दिसते.

**इतर अरब राष्ट्रे**

ट्युनिशियाच्या हुकूमशहाच्या पलायनाने अरब जगाला धक्का बसला. शेजारील नकाशावरून त्यांचे भौगोलिक सान्निध्य लक्षात घ्यावे. त्याबरोबरच आताच्या इंटरनेट सान्निध्याने प्रतिमा व बातमी लगोलग सीमापार पोचतात. त्यामुळे आपण तर आमरण सत्ताधीश राहणारच पण उत्तराधिकारीही आपणच नियुक्त करणार या उन्मादाला अचानक खीळ बसली. या धक्क्याच्या प्रतिक्रियांवरून भ्रमनिरासाच्या तीव्रतेची कल्पना यावी.

ट्युनिशियाचा शेजारी देश लिबिया. तेथे १९६९ सालापासून बंदुकीच्या जोरावर कर्नल गडाफीची एकाधिकारशाही चालू आहे. त्याने ताबडतोब ट्युनिशियातील बेन अलीची पदच्युती हे पश्चिमेचे कूट कारस्थान असल्याचा दावा केला. ही स्वत:ची कारकीर्द धोक्यात येण्याची भीती आहे कारण लोकांचा निषेध तद्देशीय हुकूमशहांविरुद्ध जेवढा आहे, तेवढाच या हुकूमशहांना स्थानापन्न ठेवणाऱ्या पश्चिमेविरुद्ध आहे.

ट्युनिशियानंतर अल्जिरिया, येमेन, इजिप्तमध्ये निदर्शनांना सुरूवात झाली आणि काही ठिकाणी तरुणांनी आत्मदहनही केले.

**इजिप्त**

इजिप्तमध्ये अशा आत्मदहनानंतर आणि एका तरुणाला पोलिसांनी इंटरनेट कॅफेतून खेचून बुकलून ठार केल्यानंतर संतापाची लाट उसळली. इजिप्त हे पश्चिमेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे अरब राष्ट्र आहे. ते आपल्या ताब्यात रहावे म्हणून ब्रिटनने निर्वाचित विरोधी राजकीय नेत्यांचे खूनही केलेले आहेत. पूर्व आणि पश्चिम यातील व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा असणारा सागरी वाहतुकीचा सुवेझ कालवा इजिप्तच्या अखत्यारीत येतो. शिवाय, इजिप्त हा एकच अरब देश आहे ज्याने इस्रायलशी शांततेचा करार केला आहे. म्हणजे, मुळात इस्रायलचे अस्तित्व मान्य केले आहे. बहुतेक अरब देश इस्रायलचे अस्तित्वही मान्य करत नाहीत. यासाठी पाकिस्तानला करते तशीच, इजिप्तलाही अमेरिका दरवर्षी कोट्यवधी डॉलर्सची मदत करते. त्याचा काही हिस्सा आजवरचा इजिप्तचा राष्ट्राध्यक्ष होस्नी मोबारक याच्याकडे जात असे. मोबारकचे वय ८२. गेली तीस वर्षे तो इजिप्तचा अध्यक्ष राहिलेला आहे. ट्युनिशियाच्या बेन अलीसारखाच तो नाममात्र निवडणुकांत सतत बिनविरोध निवडून येत असे. आपल्यानंतर इजिप्तची सूत्रे आपला मुलगा गमाल याला याच्याकडे देण्याचा त्याचा इरादा होता. पण ट्युनिशियाच्या उठावानंतर इजिप्तच्या जनतेला स्फूर्ती मिळाली. राजधानी कैरो, अलेक्झांड्रिया अशा शहरात सार्वजनिक निदर्शने सुरू झाली. ३० वर्षांत प्रथमच मोबारकची पोस्टर्स फाडण्यात आली. कैरोत तर मुख्य चौकात लोकांनी अनेक दिवस तळच ठोकला आणि मोबारकने राजीनामा दिला पाहिजे ही मागणी लावून धरली. मग मोबारकने सत्तेवर राहण्याचा बराच प्रयत्न केला. आपण सप्टेंबरमध्ये होणारी पुढची 'निवडणूक' लढवणार नाही, मुलाला नियुक्त करणार नाही अशी आश्वासने दिली पण लोकांना ते मान्य होईना. मग 'सत्ता लष्कराकडे सोपवतो' असे जाहीर केले. तरी निषेध थांबेना. शेवटी राजीनामा देऊन कुटुंबियांसह त्याने कैरोहून दुसऱ्या शहरात प्रयाण केले.

आता सप्टेंबरमधील निवडणुकांपर्यंत सत्ता लष्कराकडे राहील. मग निर्वाचित सरकारकडे सत्ता सुपूर्द होईल अशी आशा आहे.

**परिणाम**

अरब जगातील या घटनांचे पडसाद विविध पातळ्यांवर उमटले. प्रथम अर्थातच शेजारचे हुकूमशाही देश हादरले आहेत. जॉर्डनच्या राजाने तातडीने पंतप्रधान बदलला. येमेनच्या राष्ट्राध्यक्षाने पुढच्या

निवडणुकीनंतर निवृत्ती जाहीर केली. हे दोघेही अमेरिकेने पाळलेले हुकूमशहा. सीरिया-इराणवर अंकुश म्हणून जॉर्डन महत्त्वाचा. अल्-कईदाने आता येमेनमध्ये शिरकाव केला आहे म्हणून येमेनचा अध्यक्ष महत्त्वाचा. त्यामुळे अगदी डिसेंबरपर्यंत मोबारक, बेन अली, इत्यादी हुकूमशहा पश्चिमेचे दोस्त होते. पण आता तळागाळातल्या सामान्य लोकांनी अहिंसक मार्गाने दोन राजवटी तर उलथवल्या. (जी काही हिंसा झाली, ती सरकारकडून). या घडामोडीने पश्चिमेची पंचाईत झाली आहे. ज्या लोकशाहीचा गजर पश्चिम सतत करते ती लोकशाहीच पुढ्यात ठाकल्याने हुकूमशहांना पोसण्याचा ढोंगीपणा उघड झाला.

या उलथापालथीची पश्चिमेला अपेक्षा नव्हती आणि ती पश्चिमेला पचनीही पडणार नाही. खरी लोकशाही आलीच तर ती पश्चिमेच्या इशाऱ्यावर नाचणारी नसेल, ही शक्यता जास्त आहे. त्यामुळे पुढचे सत्ताव्यूह परत आपला प्रभाव या प्रदेशात कायम रहावा, इस्रायलचे हितसंबंध कायम रहावेत या दृष्टीने आखले जातील.

ब्रिटन काय किंवा अमेरिका काय यांचा इतर देशांत ढवळाढवळ करण्याचा इतिहास रक्तरंजित आहे आणि हुकूमशहांना पाठिंबा देण्याचा आहे. इस्लामी मूलतत्त्ववादी ही क्रांती इराणमध्ये त्यांनी जशी काबीज केली, तशी ट्युनिशिया-इजिप्तमध्ये करतील का हा प्रश्न आहे. वर्तमान आंदोलनांत जनसामान्यांची मागणी 'हुकूमशाही हटवा, लोकशाही आणा' ही होती व आहे. सगळ्या आंदोलनात मूलतत्त्ववादाचा उल्लेखही झाला नाही किंवा शरियाचा 'शुद्ध' इस्लाम आणा असा पर्यायही पुढे आला नाही. पण लोकशाहीची मागणी संस्थात्मकरीत्या कितपत पुढे जाईल की धर्ममार्तंड त्याला संस्थात्मक रूप देतील हे आजमितीला अनिश्चित आहे.

पण निदान पश्चिमेने उभा केलेला इस्लामी मूलतत्त्ववादाच्या भीतीचा प्रचारकी बागुलबुवा गाडला गेला आहे. त्याबरोबरच इस्लामी मूलतत्त्ववाद्यांच्या स्वतःच्या अतिरंजित ताकदीच्या भ्रमाचा भोपळाही फुटला आहे.

सांस्कृतिकदृष्ट्या मुस्लिमेतर धर्मीयांच्या संवेदनेत लक्षणीय फरक झाला आहे. इस्लाम हा धर्म प्रतिगामी आहे, मूलतःच लोकशाहीविरोधी आहे, अरब क्रूर आणि मागासलेले असतात इत्यादी पूर्वग्रह दोन महिन्यांतच ८-१० कोटींच्या आवाजाने संपुष्टात आले तरी आहेत, किंवा यावेत तरी. हा सगळ्यात महत्त्वाचा सकारात्मक परिणाम.

***चंद्रशेखर पुरंदरे***

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*